# नजर आणि दृष्टी

माणसाला जी देवांनी पंचेंद्रिय बहाल केली आहेत त्यातील महत्वाचे इंद्रिय डोळे. डोळ्यांनी आपण सभोवतालच्या गोष्टी पाहू शकतो, त्याचा आनंद घेऊ शकतो. निसर्गातील विविध रंग संगती, निसर्ग सौंदर्य, सभोवतालची सृष्टी ह्याचा आनंद घेऊ शकतो. वाचन हा तर डोळ्यांचा महत्वाचा उपयोग. ह्या ईश्वरदैत्य देणगीमुळे आपण नजरेने सगळ्या गोष्टी अनुभवू शकतो.

'नजर' हे डोळसपणाचे प्रतीक आहे. डोळे हे इंद्रिय मानले तर डोळे आणि मेंदू ह्याच्या समन्वयाने समोर बघितलेले चित्र नजरेच्या माध्यमातून स्मृती पटलावर उमटले जाते.
'नजर' फक्त दृश्य चित्रांची छबीच स्मृतिपटलावर उमटवत नाही तर 'नजर' इतकी बोलकी असते की मनातील अव्यक्त भाव नजरेतून व्यक्त होत असतात. मनातील भावनांचे दर्शन नजरेतून सहजपणे व्यक्त होत असते.

मनातील समाधान नजरेतून स्पष्ट दिसते तर मनातील दुःख नजरेतून अश्रूवाटे सहज व्यक्त होते. मनातील अत्यानंद जसा नजरेतून दिसतो तर भय, आश्चर्य ह्या भावना नजरेतून व्यक्त होतात. मनातील घालमेल आणि अस्वस्थता नजरेतून व्यक्त होते तसेच मनात खोटे भावही नजरेतील चलबिचलपणातून व्यक्त होतात.

पालक किंवा शिक्षक नजरेच्या जरबेतून पाल्यांना किंवा विद्यार्थ्यांना काबूत ठेवतात तर पोलीस अधिकाऱ्याची धारदार नजर गुन्हेगारकडून सत्य वदवून घेऊ शकते.

नजरेतील इशारे प्रेमी युगुलांचे संवादाचे माध्यम असते त्यामुळेच हेच नजररुपी बाण प्रियकराला घायाळ करतात. हा नजरेतील संवाद, प्रेमी युगुलांना शब्दाची कमतरता भरून काढण्यास मदत करतात. ह्या नजरेतील इशाऱ्यावर त्यांचा सुसंवाद सुरू राहतो.

लहान मुलांची नजर त्याचा निष्पापपणा व्यक्त करतेच पण त्याच्या मनातील खट्याळ भाव नजरेतून सहज व्यक्त होतात.

स्त्रियांना नजरेतून जेवढे सहज व्यक्त होता येते तेवढी सहजता पुरुषांमध्ये नसावी. त्याही पेक्षा पुरुषांना स्त्रियांचं मन कळत नाही हा जाहीर आरोप कदाचित ह्यामुळेच असावा की पुरुषांना स्त्रियांच्या नजरेतले भाव वाचता येत नसावे. वरील सगळ्या गोष्टीतून नजर फक्त हे पंचेंद्रियांचे

प्रभावी साधन नसून संवादाचे उत्तम माध्यमही आहे.

आता ज्या व्यक्ती जन्मतः अंध वा बघू शकत नाही त्यांचे काय? किंवा एखाद्या अपघातात व आजारपणात डोळ्यास इजा झाल्यास माणसाचे एक इंद्रिय निकामी होते त्यांचे काय? माणसाचे एक इंद्रिय जेव्हा निकामी होते त्यावेळी इतर इंद्रिये जास्त सतेजपणे कार्य करू लागतात. ह्या इतर इंद्रियांची कार्यक्षमता वाढते. म्हणून कदाचित अपंग व्यक्तींना 'दिव्यांग' हा पर्यायी शब्द दिला आहे. अंध व्यक्ती स्पर्शवाटे जास्त परिणामकारकरित्या कार्य करते. तसेच त्यांची श्रवणशक्ती जास्त कार्यक्षम असते. त्यांची घाणेंद्रिये आणि जिभेची चव इतकी तीक्ष्ण असतात की नजरेतील अपंगत्वावर त्यांना मात करता येते. नजरेतील अपंगत्वानमुळे इतर इंद्रियांची वाढलेली कार्यक्षमता ही जणू त्यांना वेगळीच 'दृष्टी' बहाल करतात.

नजर आणि दृष्टी ह्यातील मूलभूत फरक इथेच संपत नाही.

'नजर' ही माणसाला आहे तेच दृश्य दर्शवते किंबहुना तेच दृश्य स्मृतिपटलावर उमटते मात्र 'दृष्टी' ही व्यापक स्वरूपाची असते. नजरेतून सुटलेल्या गोष्टी पाहण्यासाठी एक दिव्यदृष्टी हवी. निसर्गात फिरत असताना त्याचे चित्र नजरेतून मन:चक्षुवर सहज उमटेल पण त्या निसर्गाचे खरे सौंदर्य अनुभवायचे असेल तर एक रसिक 'दृष्टी' हवी. चित्रकारांनी रेखाटलेले चित्र 'नजर बघेल पण त्या चित्रातील सौंदर्य आणि कलात्मकता अनुभवायला 'दृष्टी' हवी.

स्त्रीचे बाह्यसौंदर्य नजरेतून बघू शकतो पण तिचे निर्मळ भाव, आणि इतर गुण बघण्यासाठी दृष्टी हवी. 'नजर' वर्तमानातील दृश्य दर्शवत असेल पण भविष्याचा वेध घ्यायचा तर त्यासाठी दृष्टी हवी कारण दृष्टी दूरचा किंवा दीर्घकालीन विचार करते. 'नजर' जर short range vision दर्शवत असेल तर long range vision बघायला दृष्टी हवी. नजर जर प्राप्त परिस्थिती दर्शवत असेल तर दृष्टी त्याच्या पलीकडे जाऊन भविष्यकाळ पाहू शकते. नजर कुठल्याही गोष्टीतील बारकावे शोधते म्हणून म्हणतात, ती बारीक गोष्ट नजरेतून सुटली नाही. नजर ही थोडी संशयी असते त्यामुळे नकारात्मक बाबी जास्त सहजपणे आणि बारकाईने टिपते. दृष्टी ही थोडी व्यापक असते, ती वाईटसोबत चांगल्या गोष्टीपण सहजतेने बघते किंबहुना दृष्टी सकारात्मक बाबींकडे जास्त लक्ष देते.

एखाद्या व्यक्तीच्या परीक्षण करताना तीक्ष्ण नजरेतून बारीक बारीक गोष्टी आणि हालचाली सुटत नाहीत त्यामुळे नजर पूर्णपणे वर्तमानात असते तर दृष्टी ही थोडी व्यापकतेने पाहत असल्याने भूतकाळ आणि भविष्याचाही विचार करते. त्यामुळेच नजरेला sight आणि दृष्टीला vision हा पर्यायी शब्द आहे.

ह्या बाबत हेलन केलर ह्यांचे प्रसिद्ध वाक्य आहे,
"The only things worse than being blind is having sight but no vision."
- Helen Keller

माणसाला नुसते डोळे असून उपयोग नाही तर त्याला चांगली दृष्टी हवी.

दूरदृष्टी मुळे माणूस भविष्याचा वेध घेऊ शकतो,

'Vision is seeing visibly the light of hope within the range of the eyesight.'

त्यामुळे माणसाला फक्त नजर असून उपयोग नाही तर दृष्टीही हवी.

'Sight is what you see with your eyes. Vision is what you see with your mind.'

नजर म्हणजेच sight तुम्हाला दृश्य रूपाची जाणीव करून देते मात्र दृष्टी म्हणजेच vision तुम्हाला त्याच्या पलीकडील अदृश्य गोष्टी पाहण्यास मदत करते.

'Vision is the art of seeing what is invisible to normal sight.'

नजरेतील दृष्यमानता मर्यादित पण दृष्टी अथवा vision मधील दृश्यमानता खूप व्यापक.
त्यामुळेच सर्जनशीलता किंवा निर्मितीक्षमता ही व्यापक दृष्टीमुळेच शक्य होते.म्हणूनच म्हणतात,
"जे न देखे रवि, ते देखे कवि."
कलाकार मग तो चित्रकार, शिल्पकार, कवि किंवा सृजनशील व्यक्ती असो त्याच्याकडे असलेल्या व्यापक दृष्टीने त्यांच्यामधील प्रतिभेला फुंकर घातली जाते आणि सृजनशील कला जन्मास येते. अन्यथा सौंदर्य म्हणजे काय तर कलाकारांच्या व्यापक दृष्टीने वर्णित केलेल्या आशयाचा परिपाक होय. आजही चित्रकार राजा रवि वर्मा ह्याच्या चित्रातील देवादिकांची चित्र हीच आपल्यासाठी देवतांची रूपं ठरतात. राम, श्रीकृष्ण, शंकर, विष्णू, गणपती, हनुमान, श्रीदत्त, सरस्वती, लक्ष्मी इ. देवतांची छबी ह्या महान चित्रकारांनी त्याच्या दृष्टीने चित्रकलेच्या माध्यमातून आपल्यापुढे आणली आणि तीच प्रतिमा जनसामान्यांच्या हृदयात कोरली गेली आहेत.

नजर ही थोडी भावनाशून्य तर दृष्टी ही भावनेने ओथंबलेली.

नजरेचे नाते डोळ्याशी तर दृष्टीचे नाते मनाशी घट्ट बांधलेले.
नजर कर्तव्यदक्ष तर दृष्टी भावनिक.

'Vision will become clear only when you look into your heart.'

नजर ही एवढी तीक्ष्ण असते, त्यामुळेच अशी धारदार आणि तीक्ष्ण नजर ही पोलीस अधिकारी, सैन्यदलातील अधिकारी, नौदल अधिकारी, वायुदलातील अधिकारी तसेच तपासीय अधिकारी ह्याच्या कार्यक्षेत्रातील एक ठेव आहे. त्यामुळेच गुन्हेगार, अतिरेकी आणि देशविरोधी कारवायांवर अंकुश ठेवण्यास मदत होते.

त्यामुळेच नजर आणि दृष्टी ह्या दोन्ही गोष्टींचे एक अनन्यसाधारण महत्व आहे.
त्यामुळेच तीक्ष्ण आणि धारदार नजरेसोबत माणसाला व्यापक दृष्टीही हवी तर त्याची कलात्मकता, भावनिक प्रज्ञा अबाधित राहते.

"Life is like camera, just focus on what is important and capture the good times, develop from negatives. Even though things don't work out, just take another shot."

**- मनोज कुरुंभटी**